कारण सांगणारी लोकं यशस्वी होत नाहीत आणि यशस्वी होणारे लोक कारण सांगत नाहीत

दैनिक लोकआरंभ

लोकक्रांतीचा आरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार १७ मे २०२५ | अंक १५५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक TIME IN TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

भारतात आय फोन बनवू नका; ट्रम्प यांच्या ॲपलला सूचना, भारताकडून हालचालींना वेग

'ॲपल'ने आपल्या स्मार्टफोनचं भारतातील उत्पादन थांबवावं आणि ते अमेरिकेत सुरू करावं, अशी सूचना कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी टिम कूक यांना केल्याची माहिती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. तर दुसरीकडे ट्रम्प यांचा हा दावा केंद्र सरकारच्या सूत्रांनी खोडून काढला आहे. 'ॲपल'ने भारतातील गुंतवणूक कमी करणार नसल्याची हमी दिल्याचा दावा केंद्र सरकारच्या सूत्रांनी केला. ट्रम्प सध्या पश्चिम आशियाच्या दौऱ्यावर असून त्यांनी कतारची राजधानी दोहा इथं माध्यमांशी संवाद साधला. माध्यमांशी संवाद साधताना विचारल्या गेलेल्या एका प्रश्नाच्या उत्तरात ट्रम्प म्हणाले, "मी 'ॲपल'चे मुख्याधिकारी टिम कूक यांच्याशी चर्चा केली. त्यांनी भारतात उत्पादनांची निर्मिती करण्याऐवजी अमेरिकेत करावी, अशी सूचना मी केली आहे. टिम हे माझे मित्र आहेत. त्यांना मी नेहमीच चांगली वागणूक दिली आहे. परंतु ते आता भारतात निर्मिती क्षमता वाढवत असल्याचं समोर येत आहे. भारत स्वत:ची काळजी घेऊ शकतो. माझ्या सूचनेनंतर आता अमेरिकेतील निर्मिती क्षमता वाढवली जाणार आहे." ट्रम्प यांच्या या दाव्यानंतर नवी दिल्लीत

हालचालींना वेग आला. सरकारकडून तातडीने 'ॲपल' मुख्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आल्याचं समजतंय. त्यानंतर भारतातील गुंतवणुकीची योजना कायम असून देशात मोठी निर्मिती सुविधा उभारण्याचा प्रस्ताव असल्याची हमी अधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. 'ॲपल'ने चीनमधील उत्पादन घटविण्याचा निर्णय घेतला असून हा व्यवसाय भारताकडे वळत आहे. असं असताना ट्रम्प यांच्यामुळे 'ॲपल'ने भारतातील उत्पादन घटवलं, तर त्याचा मोठा फटका उत्पादन क्षेत्राला बसू शकतो. दरम्यान याबाबत वृत्तसंस्थेनं 'ॲपल'कडे विचारणा केली असता त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. 'ॲपल' चीनमध्ये मोठ्या प्रमाणात आयफोन बनवत होतं. पण आता ते चीनपासून स्वत:ला दूर ठेवू इच्छित आहेत. कोविड-19 महामारीच्या काळात 'ॲपल'ला सर्वांत मोठा धक्का बसला होता. त्यांच्या निर्मितीवर मोठा परिणाम झाला होता. त्यानंतर ट्रम्प यांनी चीनवर टॅरिफचा भार लादला. चीननेही त्याच्या उत्तरात टॅरिफ वाढवले. या टॅरिफ वॉरमध्ये 'ॲपल' कंपनी अडकली आणि त्यांनी चीनला सोडण्याचा निर्णय केला. त्यानंतर ते आता भारतात जमिनीच्या शोधात आहेत.

तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता :- ॲड.सचिन काळे

बीड- तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता थोडक्यात माहिती अशी की दिनांक ३०/०६/२०२० रोजी दुपारी एक वाजता सुमारास पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की इसम नामे आकाश उर्फ तानाजी शिवाजी वरवट राहणार रामतीर्थ नाका पेठ बीड हा लोकांना धाक दाखवन्याच्या उद्देशाने रामतीर्थ नाक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत आहे. त्याच्या कडे तलवार असून तो रामतीर्थ नाका परिसरात फिरत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावर सदर पोलिसांनी वरिष्ठअधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पंचांना घेऊन बातमीचा उदेश समजावून सांगुन रामतीर्थ नाका बीड येथे सुमारे दीड वाजता छापा मारला असता रामतीर्थ येथील चौकात तानाजी उर्फ आकाश वरवट हा रामतीर्थ नाक चौक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत होता त्यास पकडून ताब्यात घेतले व दोन पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एका तलवार मिळून आली. लालसर

रंगाची लाकडी पुठ्ठ्याची तिची लांबी 28 इंच असून म्याना च्या समोरील बाजूस पितळी पत्रा आहे सदरील म्यान काढुन पाहताच तिचे पात्याची लांबी २७ इंच आहे अशी असलेली जुनी वापरतील तलवार मिळून आली त्या नुसार पोलिसांनी आरोपी तानाजी उर्फ आकाश वरवट याला पोलीस स्टेशन पेठ बीड येथे घेऊन जाऊन त्याचे विरोधात गु.र.नं १७३/२०२० नुसार गुन्हा दाखल केला. त्यास कलम ४/३५ शस्त्र अधिनियम दाखल केले व त्यानंतर पोलिसांन सदरील गुन्ह्यात तपास करून दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले. दोषारोपपत्रास आर.सी.सी.क्र २३६/२०२० असा दाखल झाला होता. फिर्यादी पक्षामार्फत ५ साक्षीदार तपासण्यात आले साक्षीदारांची साक्ष आरोपीविरुद्ध आरोप सिद्ध करूशकले नाही व आरोपीचे वकील ॲड. सचिन काळे यांनी घेतलेला बचाव व सबळ पुराव्या आधारे आरोपीस मा. प्रथमवर्ग न्यायदंधादिकारी साहेब बीड यांनी आरोपीची निर्दोष मुक्त केली. आरोपीच्या वतीने ॲड.सचिन काळे यांनी काम पहिले.

कोठारी येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : तालुक्यातील कोठारी (चि) येथे स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराजांची ३६८ वी जयंती साजरी करण्यात आली.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रविकांत काकडे,प्रकाश बोरकर,आकाश काकडे,दीशांत जाधव,युवराज मोहिते,आदित्य काकडे,अभिषेक काकडे,सुनील बोरकर जनार्दन काकडे,नितीन बोरकर,प्रणव काकडे यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या घोषणेनंतर दिड महिन्यातच नांदेड आणि संभाजीनगरसाठी दोन सीट्रिपलआयटी ना मंजूरी

टाटा टेक्नॉलॉजीकडून उपमुख्यमंत्री अजित पवारांना पत्र नांदेड, संभाजीनगर जिल्ह्यांसाठी १९१ कोटींच्या दोन सीट्रिपलआयटी स्थापन करण्यास मंजूरी

मुंबई, दि. 16 :- उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांच्याच पुढाकारामुळे बीड जिल्ह्यानंतर आता नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रिपलआयटी' मंजूर करण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पाठविलेल्या पत्राला कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरसाठी दोन प्रशिक्षण केंद्रे मंजूर केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. अजित पवार यांनी घोषणा केल्यानंतर अवघ्या दीड महिन्यात मराठवाड्यातील बीड, नांदेड, संभाजीनगर या तीन जिल्ह्यांसाठी तीन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने 'बोलेन ते करेन...' ही अजित पवार यांची ओळख अधिक ठळक झाली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रयत्न आणि टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने महिन्यापूर्वी बीडसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाले आहे. त्यानंतर आता नांदेड व छत्रपती संभाजीनगरसाठी दोन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने, मराठवाड्यातील युवकांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण,

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या धडाकेबाज पुढाकारामुळे बीड, नांदेड, संभाजीनगरमध्ये सीट्रिपलआयटी ना मंजूरी

मराठवाड्यात २१ हजार युवकांना मोफत कौशल्य प्रशिक्षण मराठवाड्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण करण्यासाठी पाऊल

उद्योगक्षेत्राला कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यात नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची यानिमित्ताने पूर्ती होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याचा विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांचे सातत्याने मराठवाडा दौरे सुरु आहेत. दि. 23 मार्च 2025 रोजीच्या मराठवाडा दौऱ्यात नांदेड येथे बोलताना त्यांनी बीड, नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथे 'सीट्रीपलआयटी' उभारण्याची घोषणा केली होती. दौऱ्यावरुन मुंबईत परतल्यानंतर दि. 25 मार्च 2025 रोजी तात्काळ टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून या तीन जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. कंपनीने दीड महिन्यात तिन्ही जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर केल्याची पत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या 'सीट्रीपलआयटी'मुळे मराठवाड्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, 'एआय' वापरासह तांत्रिक कौशल्यविकासाची संधी मिळेल.युवकांना उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात 'सीट्रीपलआयटी' महत्वाची भूमिका बजावणार आहेत.'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविलेल्या पत्रात, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी प्रत्येकी 191 कोटी रुपये खर्चून नवीन 'सीट्रिपलआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे कळविले आहे. यापैकी 162 कोटी 62 लाख रुपये टाटा टेक्नॉलॉजी तर, उर्वरीत रक्कम राज्य शासन आणि संबंधित जिल्हा प्रशासन देणार आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी 7 हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून मराठवाड्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीट्रिपलआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी प्रत्येकी 7 हजार प्रमाणे मराठवाड्यातील 21 हजार युवकांना उद्योगांच्या (4.0) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे. 'सीट्रिपलआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षण खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून करणार आहेत. यामुळे नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बीड जिल्ह्यांसह मराठवाड्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल मराठवाड्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

----ooooo-----

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १७ मे २०२५
https://lokaarambh.com

संपादकीय

मेनोपॉज- निसर्ग चक्राचा भाग

या पृथ्वीतलावरील प्रत्येक स्त्रिला मेनोपॉजमधून जावे लागते. हा टप्पा वयाच्या साधारण ४०ते ५० या कालावधीत येतो.स्त्रियांना चाळीशीच्या दरम्यान मेनोपॉजची लक्षणे दिसू लागतात.मेनोपॉज म्हणजे रजोनिवृत्ती.म्हणजे स्त्रिची पाळी पूर्णपणे थांबते.साधारणपणे स्त्रियांना वयाच्या ५० व्या वर्षी मेनोपॉज येतो. काही स्त्रियांना या आधीही मेनोपॉजमधून जावे लागते.याचाच अर्थ स्त्रिची प्रजननक्षमता पूर्णपणे थांबते.हा तिच्या प्रजननाचा शेवटचा टप्पा असतो.कित्येकदा स्त्रियांची मासिक पाळी अनियमित होते.कित्येकदा महिन्यातून दोन वेळा मासिकपाळी येते.यातच स्त्रिला मानसिक आणि शारीरिक त्रासातूनही जावे लागते.छातीत धडधड होणे, अचानक घाम फुटणे, चिडचिड होणे,मूड स्विंग असे कितीतरी लक्षणे या काळात होतात. मेनोपॉज ही एक नैसर्गिक बाब आहे. जेव्हा स्त्रिला साधारण १ वर्षापर्यंत मासिक पाळी येत नाही तेव्हा त्या स्त्रीला मेनोपॉज झालेला असतो.काही स्त्रियांचा मेनोपॉज लवकर होतो तर काही स्त्रियांचा उशिरा. स्त्रियांमध्ये या काळात हार्मोन्सची कमी व्हायला लागते. इस्ट्रोजन या हार्मोन्समुळेच स्त्रियांची पाळी नियमित येते. वाढत्या वयासोबत इस्ट्रोजनची पातळी कमी कमी होत जाते आणि मेनोपॉज येण्याची लक्षणे दिसू लागतात. अशावेळी स्त्रियांच्या शरीरात अनेक बदल घडत असतात. इस्ट्रोजनच्या कमी होण्याने केस गळणे, चिडचिड होणे,मूड खराब होणे,हॉट फ्लॅशेस यासारखी लक्षणे दिसू लागतात. ही लक्षणे प्रत्येक स्त्री नुसार वेगवेगळी असतात.काहींना वरील लक्षणे जाणवतात तर काही स्त्रियांना ही लक्षणे जाणवतही नाहीत.या काळात त्वचा कोरडी पडते,मन एकाग्र होत नाही, स्मरणशक्ती कमी होते.हॉट फ्लॅशेसमध्ये मेंदूला वाटतं की शरीराचं तापमान वाढायला लागलंय.वास्तविक पाहता तसं नसतं.मन बेचैन होणे, चिंताग्रस्त होणे यासारखी लक्षणेही मेनोपॉज दरम्यान स्त्रियांना अनुभवायला येतात.

मेनोपॉजच्या काळात स्त्रियांच्या शरीरातील प्रोजेस्टेरॉन आणि टेस्टोस्टेरॉन या हार्मोन्सची पातळी कमी होते.प्रोजेस्टेरॉन दर महिन्याला स्त्रिला गर्भधारणेसाठी तयार करतं.पण मेनोपॉज झाला की याची स्त्रिच्या शरीरातील पातळी कमी होते.टेस्टोस्टेरॉनची स्त्रिच्या शरीरातील पातळी कमी होते तेव्हा स्त्रीची शारीरिक एनर्जी कमी होते.ही लक्षणे कमी करण्यासाठी नियमित व्यायाम,योगा, प्राणायाम, व्हिटॅमिन डी चे सेवन करून शरीरातील कॅल्शियमची कमतरता दूर करणे महत्त्वाचे आहे.शरीरातील स्त्री बीजग्रंथी वाढत्या वयात काम करणे बंद करतात.यामुळेच हार्मोन्सचे संतुलन बिघडते.जी महिला नोकरी करून घर सांभाळते तिला तर अधिकच ताणतणावातून जावे लागते.हा संपूर्ण काळ स्त्रियांसाठी खूप महत्त्वाचा काळ असतो.या काळात झोप व्यवस्थित न लागणे ही देखील एक मोठी समस्या आहे.हाडे ठिसूळ होणे, कसलीतरी भीती वाटणे, विसराळूपणा देखील वाढलेला असतो.म्हणजेच स्त्रियांना मेनोपॉजच्या काळात शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही समस्यांना सामोरे जावे लागते.या काळात स्त्रियांची चयापचय क्रिया मंदावल्याने त्यांच्या वजनात वाढ होते. मेनोपॉज कधी येणार हे तिच्या आईला कधी मेनोपॉज झाला यावर तसेच महिलेच्या आयुष्य जगण्याच्या पध्दतीवरही अवलंबून असते. मेनोपॉजचा त्रास कमी करण्यासाठी आहारात पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे. मसालेदार,कॅफिनयुक्त पदार्थांचे सेवन करणे शक्यतोवर टाळावे. मेनोपॉज कुठलाही आजार नाही तर शरीरात होणारा बदल आहे.मासिकपाळी सुरू होताना जशी प्रत्येक मुलीच्या मनाची घालमेल होते तशीच घालमेल मासिकपाळी बंद होताना स्त्रिया अनुभवतात.हा एक नैसर्गिक भाग आहे.या पर्वाला स्त्रियांनी सकारात्मक दृष्टीने स्विकारणे महत्वाचे आहे.

डॉ.लैलेशा भुरे

कृतघ्न तुर्कीवर भारताचे बहिष्कार अस्त्र

पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे भ्याड हल्ला करून २६ निष्पाप पर्यटकांना ठार केले. या भ्याड हल्ल्याने भारतात संतापाची लाट उसळली. या हल्याचा जगभर निषेध केला गेला. भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिन्दुर मोहीम राबवून पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांचे अड्डे नष्ट केले. ऑपरेशन सिन्दुर मोहिमेत भारतीय सैन्यदलाने शंभरहून अधिक जहाल दहशतवाद्यांना यमसदनी पाठवून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवताना फक्त दहशतवाद्यांना टार्गेट केले. भारताने पाकिस्तानी नागरिक किंवा सैन्यदलाला इजा पोहचवली नाही असे असतानाही पाकिस्तानने भारताच्या नागरी वस्तीवर आणि भारतीय सैन्यदलावर ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला अर्थात भारतीय सैन्यदलाने हा हल्ला परतावून लावतानाच थेट पाकिस्तानात घुसून पाकिस्तानचे हवाई अड्डे नष्ट केले. भारत पाकिस्तान दरम्यान सुरू झालेल्या या युद्धात कारण नसताना तुर्की आणि अझरबैजान या दोन देशांनी पाकिस्तानची बाजू उचलून धरली इतकेच नाही तर तूर्कीने थेट पाकिस्तानला लष्करी मदत करत पाकिस्तानला ड्रोन आणि इतर लष्करी साहित्य पुरवले. पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्यासाठी जे ड्रोन पाठवले होते ते तुर्की या देशानेच दिले होते अर्थात भारताच्या भक्कम संरक्षण दलाने ते हवेतच भेदून टाकले. तुर्की या देशाने पाकिस्तानला मदत करताना थेट भारतावर टीका केली की भारतानेच पाकिस्तानवर हल्ला केला म्हणून त्यांनी पाकिस्तानला मदत केली. वास्तविक पाकिस्ताननेच दहशतवादी हल्ला घडवून

आणला त्यामुळे पुढील संघर्ष निर्माण झाला हे संपूर्ण जग मान्य केले असताना तुर्की मात्र हे मान्य करायला तयार नाही याचा अर्थ पाकिस्तानने भारतात दहशतवादी कारवाया कराव्यात, आमच्या निष्पाप नागरिकांना मारावे आणि आम्ही ते निमूटपणे पाहत बसावे असे तूर्कीला सुचवायचे आहे का ? तुर्की प्रमाणेच अझरबैजान या देशाने ही पाकिस्तानला पाठिंबा देत भारतावर टीका केली. या दोन्ही देशांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला नाही मात्र भारतावर टीका करत पाकिस्तानला पाठिंबा दिला. या दोन्ही देशांचा हा कृतघ्नपणाच आहे. कारण या दोन्ही देशांना भारताने वेळोवेळी मदत केली आहे. या दोन्ही देशांना भारताने आपले मित्र राष्ट्र मानले आहे. या देशांनी मात्र भारताशी मैत्री निभावणे तर सोडाच पण भारताचा शत्रू असलेल्या पाकिस्तानला मदत करून भारताशीच शत्रुत्व पत्करले आहे. भविष्यात याचा त्यांना मोठा फटका बसणार हे निश्चित.

२०२३ साली तुर्की आणि सीरिया या देशात मोठा भूकंप झाला होता. या भूकंपात तूर्कीची मोठी वित्त आणि जीवितहानी झाली होती. या भूकंपात तूर्कितील ५० हजारांहून अधिक नागरिक मरण पावले होते. तूर्किवर आलेल्या या नैसर्गिक संकटात भारताने आपली मैत्री निभावत तूर्किला अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, औषधे यांचा पुरवठा केला. दुसऱ्या कुठल्या देशाच्या आधी भारताने या देशांना मानवी सहाय्य पुरवण्यासाठी धाव घेतली. त्यासाठी भारताने ऑपरेशन दोस्ती मोहीम राबवली. ऑपरेशन दोस्ती मोहिमेअंतर्गत भारताने तूर्कीला संकट काळात मदत केली त्यामुळे तेथील जनतेने भारताचे आभार मानले मात्र तेथील सरकारने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला पाठींबा देत कृतघ्नपणा केला आणि आता युद्धात पाकिस्तानच्या बाजूने उभे राहून भारताशी शत्रुत्व पत्करले. दरवर्षी लाखो भारतीय तुर्कीला भेट देतात. त्यातून त्यांना वर्षाला तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. अझरबैजान या देशातही लाखो भारतीय पर्यटक भेट देतात. त्यांची अर्थव्यवस्थाही भारतीय पर्यटकांवर अवलंबून आहे. या दोन्ही देशातून भारतात व्यापार चालतो. तुर्की या देशातून मोठ्या प्रमाणात फळांची आयत होते. तुर्की या देशातून येणाऱ्या सफरचंदाला भारतात मोठी मागणी आहे. तुर्की आणि अझरबैजान या देशात चित्रपट निर्माते, दिग्दर्शक चित्रपटांचे, मालिकांचे आणि वेबसिरिजचे चित्रीकरण करतात त्यातूनही त्यांना मोठा महसूल मिळतो आता या दोन्ही देशांनी जो कृतघ्नपणा केला त्यामुळे या दोन्ही देशांविरुद्ध भारतात संतापाची लाट उसळली असून या दोन्ही देशांना धडा शिकवण्यासाठी बॉयकॉट तुर्की अँड अझरबैजान ही मोहीम भारतात राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत भारतातील नागरिक या दोन्ही देशांवर बहिष्कार टाकत आहेत. बॉलिवूडने तुर्की आणि अझरबैजान या दोन्ही देशात चित्रीकरण करण्यास नकार दिला असून या देशांवर बहिष्कार टाकला आहे. पर्यटक व्यावसायिकांनीही या दोन्ही देशातील आपले बुकिंग रद्द करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. व्यापाऱ्यांनीही तूर्कितून येणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार टाकला आहे. भारताचे हे बहिष्कार अस्त्र या दोन्ही देशांच्या मुळावर येणार आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशांवर टाकलेल्या या बहिष्कार अस्त्राने या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था गोत्यात येऊ शकते. असंगाशी संग केल्याचा परिणाम या दोन्ही देशांना भविष्यात भोगावा लागणार आहे

उस्माननगर मंडळाअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान शिबीर संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : उस्माननगर मंडळाअंतर्गत मौजे दहीकळबा येथे "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" आज आयोजित करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत गावपातळीवर नागरिकांची कामे व्हावीत यादृष्टीने या शिबीराचे आयोजन करण्यात आले असून जनतेने या शिबीराचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन कंधारचे प्रभारी उपविभागीय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी केले आहे. यावेळी दहिकळंबा गावचे सरपंच अवधुत शिंदे, लाडकाचे सरपंच तानाजी शिंदे, ग्रा.प.सदस्य किशन शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष मारोती शिंदे, नायबतहसिलदार उत्तम मुद्दिराज, तहसिल कार्यालयाचे सहा.महसूल अधिकारी मोहिजे, उस्माननगरचे मंडळ अधिकारी गजानंद

ऐनवाड, दहिकळंबा येथील ग्राममहसूल अधिकारी शहाजी निकम, शिराढोणचे ग्राममहसूल अधिकारी शिराढोण खंडू रेणके, आलेगावचे ग्राम महसूल अधिकारी श्रीमती भाग्यश्री धनकुलवार, हळदाचे ग्राम महसूल अधिकारी श्रीमती स्वाती किरकण, ग्रामसेवक श्रीमती कल्पना राठोड उस्माननगर मंडळातील कोतवाल उपस्थीत राहून योगदान दिले. या शिबिरात ग्रामस्थांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. यावेळी रहिवास उत्पन्न दाखले वितरण करण्यात आली. रेशन कार्डचे वितरण (ई रेशन कार्ड), संजय गांधी, श्रावण बाळ योजनांचे फार्म भरून घेण्यात आले. आधार कार्ड सेवा मार्गदर्शन व वाटप करण्यात आले. पीएम किसान योजनांची माहिती देण्यात आली. अँग्रीस्टॅक योजनाचे आयडी काढून त्यांचे वाटप करण्यात आले. जिवंत 7/12 चे अगोदर नोंदणी केलेले वाटपाबाबत या शिबिरात माहिती देण्यात आली. नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप व ई-केवायसी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. नागरीकांच्या तक्रारी व अडीअडचणीचे निराकरण करण्यात आले. शिबिरासाठी उस्माननगर मंडळातील नागरिक व ग्रामस्थ बहूसंख्य संख्येने उपस्थित होते.

प्रबोधनातून घडवलेले संस्कार. एक शिकवण

एक राजा होता. अतिशय हुशार तितकाच न्यायी. प्रजेवर अपत्याप्रमाणे प्रेम करणारा. त्याच्या मनात प्रजेच्या सुखाचाच विचार सदैव असे. याच कारणाने तो अधूनमधून वेष पालटून आपल्या प्रजेची परीक्षा पाहण्यासाठी अनेक क्लुप्त्या करी. प्रजेने चांगले वर्तन करावे , एकमेकांना सहाय्य करावे , चांगली वृत्ती बाळगावी या हेतूने तो अनेक वेगवेगळ्या गोष्टी करून पाही जेणे करून प्रजा त्यातून काही शिकू शकेल.

एकदा त्याने अशीच एक क्लृप्ती घडवून आणली. भल्या पहाटे राजमार्गावर भला मोठा पाषाण आणून वाटेतच ठेवला. शासकीय अधिकाऱ्यांना त्याने तंबी देऊन ठेवली की कितीही तक्रारी आल्या तरी हा पाषाण हटवायचा नाही. पाषाणाच्या आजूबाजूला एक ही सरकारी कर्मचारी दिसता कामा नये. अशी सर्व व्यवस्था करून राजाचे बुरुजावरुन न्याहाळणे सुरू झाले. नक्की काय प्रतिक्रिया उमटतात याचा अंदाज राजा रोज घेऊ लागला. अनेक रहिवासी, व्यापारी, राजमार्गावरून नियमित ये जा करणारे सारेच विस्मयचकित झाले.. अचानक हा पाषाण राजमार्गावर वाटेत कसा काय? लोकं घोळक्या घोळक्याने जमू लागले. चर्चा सुरू झाली..राजाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी गेल्या. अधिकाऱ्यांनी तक्रारी नोंदवून घेतल्या. आश्वासने दिली पण फारसा त्याचा उपयोग झाला नाही. पाषाण हटवला गेला नाही. लोकांनी सरकारी कामावर ताशेरे ओढले. वेगवेगळ्या प्रतिक्रिया येतच होत्या पण कुणीही पाषाण हटवण्यासाठी काहीही केले नाही. पौरवासी, व्यापारी सारे वळसा घालून जात होते. रोज शिव्या घालत होते. टीका टिपण्या चालूच होत्या. राजाला, राजाच्या राज्यकारभाराला दूषणे देणे चालूच होते. राजाला प्रजेची काळजी नाही, प्रजेच्या हिताची त्याला पर्वा नाही अश्या प्रकारे राजावर सर्वजण तोंडसुख घेऊ लागले.

एक दिवशी एक हमाल हातगाडी घेऊन त्या रस्त्याने चालत होता. त्याच्या हातगाडीवर बरेच जड सामान होते. वाटेत हा भला मोठा पाषाण पाहून तो थबकला. आता ही अवजड सामानाची गाडी मी नेऊ तरी कशी या विचाराने चिंताग्रस्त झाला. त्याला सामान ठरलेल्या जागी लवकर पोहोचवणे भाग होते. बघू या काही प्रयत्न करून अश्या विचाराने तो पाषाणाला जोर लावून हलवू लागला.. पण भला मोठा पाषाण त्याच्या एकट्याच्या जोराने ढिम्म हालेना. त्याचा प्रयत्न पुन्हा पुन्हा सुरूच होता. आसपास बरीच लोकं जमली. त्याला अनेक सल्ले देऊ लागली. त्याच्या प्रयत्नाला वेडेपणाचा कळस म्हणत हसू लागली. फक्त मजा बघत सगळे भोवती जमले होते पण एकानेही त्याला मदतीचा हात दिला नाही. हमालाला कोणत्याही परिस्थितीत त्याच्या हातगाडीवरचे सामान लवकरात लवकर पोहोचवायचे होते त्यामुळे त्याने प्रयत्न करणे चालूच ठेवले.

शेवटी त्याने देवाला प्रार्थना केली आणि त्या पाषाणाला नमस्कार करून पाषाणाभोवती प्रदक्षिणा घालू लागला. प्रदक्षिणा घालताना पाषाणाचे तो बारकाईने निरीक्षण करत होता.. तेवढ्यात त्याच्या लक्षात आले पाषाण खालच्या बाजूने गोलाकार आहे. त्याने जोर एकवटून गोलाकार दिशेने पाषाणाला धक्का दिला तसा पाषाण गडगडत सरकू लागला. या गतीमुळे पाषाणाला मार्गातून दूर करता येणे हमालाला शक्य झाले. पाषाण वाटेतून सरकवून झाल्यावर गाडीपाशी येताना पाषाणाच्या मूळ जागी त्याला एक थैली दिसते. कुतूहलाने थैली हातात घेऊन तो पाहतो तर काय... थैली मोहरांनी भरलेली असते. थैलीखाली चिठ्ठी असते.... राजाची "पाषाण दूर करण्याची खास बक्षिसी" !! हे दृश्य पाहणारी सभोवार जमलेली मंडळी खजील होऊन हळहळू लागतात... आपण का नाही हलवला पाषाण ? आपणही या बक्षिसाला पात्र झालो असतो इ इ. सारांश : या कथेतून हा बोध मिळतो की अडचण दिसताच पळून न जाता किंवा चर्चेच्या नुसत्या वल्गना न करता अडचण दूर करण्याचा प्रयास करावा. कुणी अडचणीवर मात करत असेल तर त्याला मदत करावी. त्याला हसू नये. एखादी गोष्ट अनेक लोकांसाठी अडचणीची होत असेल तर सर्वांनी मिळून प्रयत्न करावे व अडचण सोडवावी. संकट कितीही बिकट असेल तरी परमेश्वराला स्मरून संकटाला तोंड द्यावे. मार्ग सापडतोच ! प्रयत्नांती परमेश्वर .. उचित दिशेने केलेला प्रयास व देवावरील निष्ठा आणि श्रद्धेने केलेल्या प्रार्थनेमुळे संकट, अडचणी दूर होतातच आणि नवीन संधी देखील प्राप्त होते. बक्षीस ही मिळते.

'एकमेका साहाय्य करू
अवघे धरू सुपंथ.'

सरोज भिडे, विरार
८६००३०१७७८

दिमाखवाडीच्या सानिका देवकर, रोहण देवकरचे दहावीच्या परीक्षेत यश

प्रतिनिधी | बीड

सेंट झेवियर्स स्कूल, गेवराई च्या सानिका संतराम देवकर हिने दहावीच्या परीक्षेत ९४.६० टक्के तर व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीडच्या रोहन बप्पासाहेब देवकर या विद्यार्थ्याने ९१.४० टक्के घेऊन यश संपादन केले. या यशाबद्दल दोघांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दिमाकवाडी तालुका गेवराई येथील सानिका संतराम देवकर या विद्यार्थीनिने मराठीमध्ये ९१, हिंदी ८४, इंग्रजी ९६, गणित ९६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ८९, सामाजिक विज्ञान ९८ गुण मिळवत यश संपादन केले. तर रोहण बप्पासाहेब देवकर याने मराठीमध्ये ८८, संस्कृत ९३, इंग्रजी ८७, गणित ७६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ९६, सामाजिक विज्ञान ९३ गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल सानिक आणि रोहनचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १७ मे २०२५
https://lokaarambh.com

समृद्धी महामार्गावर भीषण अपघात : दोघे जखमी

कारंजा, ता.प्रतिनिधी १५ मे समृद्धी महामार्गावरील चैनल १८२ जवळ गुरुवारी सकाळी ११ वाजता एका कारला भीषण अपघात झाला. या अपघातात अमृत सालोडकर (३५) आणि अंजली शर्मा (३०) हे दोघे प्रवासी जखमी झाले. प्राप्त माहितीनुसार, एमएच ३१ एफ ८३०९ क्रमांकाची कार वाशिम येथून नागपूरकडे जात होती. दरम्यान, समोरील वाहनाने अचानक ब्रेक मारल्याने त्यांच्या कारची समोरून जोरदार धडक झाली. अपघातामुळे कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून दोघेही प्रवासी गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच जखमींना तात्काळ कारंजा उपजिह्ला रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी इतर रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दरम्यान, अपघाताच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी समृद्धी महामार्गावरील वाहतूक यंत्रणा अधिक सतर्क राहणार असल्याचे संकेत सूत्रांकडून मिळाले आहेत. घटनास्थळी अपघाताचा तपास सुरू आहे.

प्रशिक्षणार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना - आधार व्हेरिफिकेशन थांबवा!

वाशिम): जिह्ला कौशल्य विकास, उद्योजकता व रोजगार मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार, सद्यस्थितीत कोणत्याही प्रशिक्षणार्थ्यांनी आधार व्हेरिफिकेशन करू नये, अशी सूचना देण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या यादीची प्रक्रिया सुरू असून, येत्या दोन दिवसांत आधार व्हेरिफिकेशन न केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची यादी उपलब्ध होणार आहे. यादी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यामध्ये ज्यांचे नाव असेल, त्यांनीच पुढील प्रक्रिया म्हणून आधार व्हेरिफिकेशन करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशिक्षणार्थ्यांनी यासंदर्भात कोणतीही घाई न करता यादीची वाट पाहावी आणि अधिकृत सूचनेनुसारच पुढील पावले उचलावीत, असे आवाहनही विभागाकडून करण्यात आले

सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातर्फे राष्ट्रीय पुरस्कार 2024 साठी अर्ज करण्याचे आवाहन

नवी दिल्ली, दि.16: केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने सूक्ष्म, लघु आणि मध्यम (एमएसएमई) उद्योजकांच्या उत्कृष्ट कामगिरीची आणि त्यांच्या योगदानाची दखल घेऊन राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार देऊन त्यांना प्रेरित आणि प्रोत्साहित करते. वर्ष 2024 साठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना विविध श्रेणींमध्ये 35 राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. महिला उद्योजक, अनुसूचित जाती/जमातीतील उद्योजक तसेच ईशान्येकडील राज्यांमधील एमएसएमई उद्योजकांना विशेष तरतूदीद्वारे पुरस्कार दिले जातात. या योजनेअंतर्गत, पुरस्कारप्राप्त एमएसएमईंना 3 लाख रुपये (प्रथम पुरस्कार), 2 लाख रुपये (द्वितीय पुरस्कार) आणि 1 लाख रुपये (तृतीय पुरस्कार) बक्षीस स्वरूपात दिले जातात. त्याचबरोबर चषक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले जाते. राष्ट्रीय पुरस्कारांच्या 2024 च्या विविध श्रेणीसाठी एमएसएमईकडून अर्ज मागवण्यात आले आहेत. दिनांक 14.04.2025 ते 20.05.2025 या कालावधीत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल (https://dashboard.msme.gov.in/na/Ent_NA_Admin/Ent_index.aspx) द्वारे हे अर्ज सादर केले जाऊ शकतात. इच्छुक सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग, गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल (https://awards.gov.in/) द्वारे देखील त्यांचे अर्ज सादर करू शकतात. याबाबतचा तपशील www.dcmsme.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक अर्जकर्ते अधिक माहितीसाठी जवळच्या एमएसएमई - विकास आणि सुविधा कार्यालय (MSME - DFO) किंवा दूरध्वनी क्रमांक 011-23063342 वर संपर्क साधू शकतात.

लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? नीलम गोऱ्हेंनी स्पष्टच सांगितलं

ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण ही योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत महिलांच्या खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. मात्र जर आमची सत्ता पुन्हा आली तर आम्ही 2100 रुपये देऊ अशी घोषणा विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीकडून करण्यात आली होती, मात्र अजूनही याबाबत कोणताही

निर्णय घेण्यात आलेला नाही, यावरून विरोधकांकडून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न होत आहे, यावर आता शिवसेना नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला आहे. तसेच 2100 रुपयांबाबत देखील मोठं वक्तव्य केलं आहे. त्या जालन्यात बोलत होत्या. नेमकं काय म्हणाल्या नीलम गोऱ्हे? लाडक्या बहिणींना शासनाच्या वतीने मदत देण्यात आली. त्यापेक्षाही जास्त त्यांचा स्वाभिमान आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभा राहण्याच्या दृष्टिकोनातून जे पाऊल महायुती सरकारने उचललं होतं, त्यामधून या जिल्ह्यातल्या किती महिलांना मदत मिळालेली आहे. लाडक्या बहिणीचे जे उर्वरित काही प्रश्न असतील ते सोडवण्यासाठी, शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, ऊसतोड कामगारांचे प्रश्न आहेत, अन्य काही योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी या सर्व गोष्टींसाठी उपमुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचनेनुसार मी जिल्ह्या जिल्ह्यांमध्ये दौरा करत आहे. यासंदर्भात मी ठीक ठिकाणी महिलांसोबत बोलत आहे, त्याच्यांकडून माहिती जाणून घेत आहे. महिलांची जी काही 2100 रुपयांची मागणी आहे,

अदिती जाधव हीचे सीबीएसईत यश..

प्रतिनिधी नुकत्याच लागलेल्या सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या निकालात नाशिक येथील होरायझन अकॅडमीची विद्यार्थीनी अदिती श्वेता समिर जाधव हीने घवघवीत यश संपादन करत ९३ टक्के गुण संपादन केले. विशेष म्हणजे कोणतीही खाजगी शिकवणी नसतांना तीने मराठी विषयात १०० पैकी ९९ तर इंग्रजी विषयात ९८ गुण घेतले. या यशाबद्दल तीचे अंबड तालुक्यातील मठपिंपळगाव येथील बळीराम पाटील जिगे, डॉ.राहुल पाटील डोंगरे, योगेश जिगे, प्रा.सुभाष जिगे आदींनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

रजत महाजन यांची अमेरिकेत पदव्युत्तर पदवी; जिद्द आणि मेहनतीचे फळ!

प्रतिनिधी पाचोड दि. 16 मे शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड येथील प्रा. संदीप सातोनकर यांचे भाचे चि. रजत देविदास महाजन यांनी ॲरिझोना स्टेट युनिव्हर्सिटी (अमेरिका) येथून कम्प्युटर सायन्समध्ये यशस्वीरित्या पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. यापूर्वी त्यांनी पीआयसिटि कॉलेज, पुणे येथून कम्प्युटर इंजीनियरिंगची पदवी संपादन केली आहे. आपल्या यशाचे श्रेय रजत यांनी कठोर मेहनत, अभ्यासातील सातत्य, गुरुजनांचे योग्य मार्गदर्शन आणि

आई-वडिलांच्या आशीर्वादाला दिले आहे. 'मेहनत, चिकाटी आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न नेहमीच फलदायी ठरतात,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रजत यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्री. ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष श्री. राजूनाना भुमरे, श्री. शिवराज भुमरे, प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे आणि श्री. सतीश वाघ यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यासोबतच महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुद्धा रजत यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

किल्लेधारूर शहरातील कसबा विभागातील रस्त्यांची दयनीय अवस्था.

किल्लेधारूर / वार्ताहर किल्लेधारुर शहरात कसबा विभागात पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. हे काम करताना गुत्तेदाराच्या चुकीमुळे नागरिकांना वागणेही अवघड झाले आहे. पाईपलाईन खोदताना निघालेले दगड, माती पाईपलाईन बुजताना खड्यात टाकणे अपेक्षित आहे पण ती थातुरमातूर पध्दितेने बुजली आहे. उरलेली माती रस्त्यावर पसरली गेली असून अवकाळी

पावसानेच रस्ते चिखलमय व खड्डेमय झाले आहेत. वाहन तर दुरच पण पायी चालणेही अशक्य झाले आहे. अवकाळी पावसातच ही अवस्था असून पावसाळ्यात यापेक्षाही वाईट अवस्था होणार आहे. नवीन रस्ते होण्यासाठी बराच कालावधी लागणार असून या रस्त्यावर नगर परिषदेने निदान मुरूम तरी टाकून होणारे हाल थांबवावेत अशी कळकळीची मागणी कसबा विभागातील नागरीक करत आहेत.

मान्सून पुर्व स्वच्छता कामा बाबत परळी नगर परिषद ॲक्शन मोडवर

परळी नगर परिषदच्या स्वच्छता विभागाकडुन मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना वेग

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- शहरात मान्सून पुर्व स्वच्छता कामा बाबत परळी नगर परिषद अक्शन मोडवर आली आहे. स्वच्छतासह मोठ्या नाल्यांची साफसफाई मोहिम सुरू झाली आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन, कचरा आणि गाळ नाल्यात टाकू नये, जेणेकरून पावसाळ्यात पाणी व्यवस्थित रस्ता मिळवू शकेल आणि शहरात पूर येण्याची शक्यता कमी होईल. परळी नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाकडुन मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना गती देण्यात आली आहे. जे.से.बी., ट्रॅक्टर आदी मशनरीसह स्वतंत्र मजुरांची नियुक्ती करुन साफसफई करण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांनी केले आहे.

शहरात पावसाळापूर्व स्वच्छता कामाना गती दिली आहे. शहरात अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये पाणी साचल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण व्हायची आशा ठिकाणी स्वच्छता सुरू करण्यात आली आहे. नगरपरिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे ॲक्शन मोडर आले आहेत. मान्सून पूर्व शहरातील नाले सफाईवर प्रशासनाने जोर दिला आहे. शहरातील अनेक नाल्यांमध्ये गाळ काढण्याचे काम व सफाई नगर परिषदद्वारे करण्यात येत आहेत.

नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, उपमुख्यधिकारी संतोष रोडे व स्वच्छता विभाग शंकर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागातील विलास केदारी, सुरेश वाल्मिकी, राजाभाऊ जगतकर, राजाभाऊ गायकवाड, जेसीबी चालक सिद्धार्थ कसबे, धनराज कसबे व सर्व अधिकारी आणि कर्मचार्यांच्या सहकार्याने पावसाळापूर्व कामे हाती घेण्यात आली आहेत. पावसाळ्यात शहरातील मोठे नाले आणि नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येणार नाही. नागरीकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

शहरातील उखळवेस ते सिमेंट फेक्ट्री, सरस्वती नदी गोपाळ टॉकीज ते सार्वजनिक समशान भूमी मलिकपुरा, पंचायत समिती नाथ रोड ते घरणीकर रोड, घरणीकर रोड ते हमालवाडी, साई नगर, सोमेश्वर नगर ते शारदा नगर, काळरात्री मंदिर ते घनशी नदी तसेच विविध भागातील नाल्या यासह शहरातील विविध छोट्या मोठ्या नाल्यांमधील गाळ व कचरा काढण्यात येत आहे. यासाठी दोन जेसीबी, सहा ट्रॅक्टरद्वारे व कर्मचारयांच्यासह्याने साफसफई करण्यात येत आहे. पावसाळा सुरु होई पर्यन्त ही साफसफाई करण्यात येणार असुन या काळात शहरातील ज्या नाल्या तुंबल्या आहेत. त्यातील गाळ काढण्यात येणार आहेत.

वीस कोटीतच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण ; वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवारांच्या राजीनाम्याची मागणी :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- (दि.१६) अवकाळी पाऊस ,कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळामुळे नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा, मालाला हमीभाव नसणं या प्रमुख कारणांमुळे शेतकरी मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने मिळत नाही. वारंवार निवेदने

आणि आंदोलने केल्यानंतर सरकारला जाग येते आणि सरकार तुटपुंज्या निधीची तरतूद करते. दि.१५ मे रोजी संपुर्ण राज्यासाठी केवळ २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असुन या निधीतून प्रलंबित सर्व शेतकऱ्यांच्या वारसांना मदत मिळणे शक्यच नाही.परीणामी शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. केवळ २० कोटीतच शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण केल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्यांनी दिली वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार हे सोमवार रोजी बीड जिह्ला दौऱ्यावर असुन जिह्ला नियोजन समितीची बैठक प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेण्यासाठी येणार असुन शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येणार असल्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिह्ला माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस, शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, पांडुरंग हराळे आणि बीड जिह्लाध्यक्ष इंटक रामधन जमाले, उपाध्यक्ष इंटक संदिप झिंजुर्के यांनी तहसीलदार (महसूल) जिह्लाधिकारी कार्यालय बीड अविनाश शिंगटे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड यांना दिले आहे.

६ विभागांसाठी केवळ २० कोटी ; वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी राजीनामा द्यावा :- डॉ.गणेश ढवळे राज्यातील कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या सहा विभागांसाठी केवळ २० कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. विभागीय आयुक्त. वितरीत निधी

कोकण १२ लाख
पुणे १ कोटी ६ लाख
नाशिक. ३ कोटी ३९ लाख
छत्रपती संभाजीनगर ४ कोटी. ९२ लाख
अमरावती. ६ कोटी ७६ लाख
नागपूर ३ कोटी ७५ लाख
एकुण २० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

मराठवाड्यात १ जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या ३ महिन्यात २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. यात बीड जिह्ला ७१ ,लातुर १८, धाराशिव ३१, छत्रपती संभाजीनगर ५०, जालना १३, परभणी ३३, हिंगोली ३७ अशा एकुण २६९ शेतकरी आत्महत्यांची नोंद आहे.

बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान छत्रपती संभाजीनगर विभागासाठी केवळ ४.९२ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. या विभागात बीडसह ८ जिह्ले येतात.यातुन कोणत्या जिल्ह्याच्या वाट्याला किती येतात?? यातुन सर्व शेतकरी कुटुंबियांना मदत मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १७ मे २०२५
https://lokaarambh.com

एकीकडे पाकिस्तानसोबत वाद, आता दुसरीकडे भारत-बांगलादेशच्या सीमेवर तणाव

एकीकडे भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावाची स्थिती आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले आहे. एकीकडे भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघ्या संघर्ष चालू असताना दुसरीकडे भारत आणि बांगलादेशच्या सीमेवर मोठ्या घडामोडी घडत आहेत. भारत सीमेवरून काही लोकांना बांगलादेशच्या सीमेत पाठवत आहे, असा आरोप करत बांगलादेशने सीमेवर गस्त वाढवली आहे. याच कारणामुळे सध्या बांगलादेशने नाराजी व्यक्त केली आहे. भारतातून बांगलादेशमध्ये लोक पाठवले जात असल्याचा दावा भारतीय नागरिकत्त्व नसलेल्या लोकांना भारताकडून बांगलादेशमध्ये पाठवले जात असल्याचा दावा बांगलादेशने केलाय. सिलहट, मौलवीबाजार, खगराछारी, कुरीग्राम, सतखीरा, सुंदरबन या वेगवेगळ्या सहा सीमाभागांतून एकूण 340 बांगलादेशमध्ये जबरदस्तीने पाठवण्यात आल्याचं बांगलादेशने म्हटलंय. याच कारणामुळे दोन्ही देशांतील संबंध ताणले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बांगलादेशने 262 लोकांना पकडले या करावायांतून फक्त बांगलादेशी नागरिकच नव्हे तर रोहिंग्या शरणार्थी, तसेच अवैध पद्धतीने भारतात प्रवेश करणाऱ्यांनाही बांगलादेशमध्ये पाठवले जात आहे, असा बांगलादेशचा दावा आहे. गेल्या



काही दिवसांत बॉर्डर गार्ड्स बांगलादेशने (बीजीबी) 262 लोकांना पकडले आहे. यातील 223 नागरिक हे बांगलादेशी आहेत. तर 19 जण रोहिंग्या आहेत. अन्य लोक नेमके कोणत्या देशाचे आहेत, याची माहिती मिळू शकलेली नाही. बांगलादेशने भारताला पाठवलं पत्र सीमेवर होत असलेल्या या सर्व कथित प्रकारामुळे बांगलादेश सरकारने 9 मे रोजी भारताला एक पत्र पाठवले आहे. लोकांना बांगलादेशमध्ये पाठवण्याच्या या घनटांना लवकरात लवकर थांबवावे, अशी मागणी या पत्राच्या माध्यमातून बांगलादेशने केले आहे. एखादी व्यक्ती खरंच बांगलादेशी असेल तर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्या व्यक्तीला बांगलादेशमध्ये परत घेतले जाईल. मात्र अशा पद्धतीने जबरदस्तीने होत असलेली घुसखोरी चुकीची आहे, असे बांगलादेशने म्हटले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार भारताने बांगलादेशातील या कथित घुसखोरीला आळा न घातल्यास बांगलादेशही लोकांना भारतीय प्रदेशात पाठवण्यावर विचार करण्याची शक्यता आहे. दरम्यान, या कथित घटनांमुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध प्रभावित होण्याची शक्यता आहे. बांगलादेशच्या गृहमंत्रालयामार्फत बांगलादेशमध्ये अवैध पद्धतीने राहणाऱ्या भारतीय नागरिकांची सूची तयार केली जात आहे. दोन्ही देशांतील संबंधांमध्ये सुधारणा न झाल्यास बांगलादेश प्रत्युत्तर म्हणून काही कारवाई करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या सर्व घडामोडींमुळे भारत-बांगलादेशच्या सीमेवर तणावाची स्थिती निर्माण होऊ शकते. तसेच या दोन्ही देशांचे संबंधही बिघडू शकतात.

स्व. गुणाबाई रामचंद्र गाडेकर यांचा ५०वा स्मृतीदिन धारावीत संपन्न

नुकताच १६ में २०२५ रोजी सकाळी १०-३० वाजता स्थळ जय भवानी क्रीडा मंडळ नवी चाळ पटांगणात येथे अक्षरश्री विलास देवळेकर लिखित "स्व. गुणाबाई गाडेकर" यांच्या नावाने ६फूट कविता फ्लॅक्स लावले होते. एक छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन "धारावी झोपडपट्टी पोलिस पंचायत आणि वुमन वेल्फेअर फोरम" यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजक जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वृत्तपत्र लेखक दिलीप गाडेकर यांनी सुत्रसंचलन आणि ५०वा स्मृतीदिन कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करताना, स्व. गुणाबाई गाडेकर आणि स्व. सावित्री बोराडे ह्या दोन्ही महिला चर्मकार समाजाच्या असून, त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत सहभागी होत्या. याची जाणीव व माहिती करून दिली. रोहिदास मंचावरील प्रमुख पाहुणे म्हणून

उपस्थित सामाजिक कार्यकर्ते - साहित्यिक व अक्षरश्री विलास देवळेकर, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री दिलीप गाडेकर, श्रीमती अलका साबळे, आणि सामाजिक कार्यकर्ते गिरीराज शेरखान उपस्थित होते.

सुरुवातीला सामाजिक कार्यकर्ते गाडेकर यांनी, आपल्याला वाचनातून माहिती व प्रेरणा मिळते. असाच काहीसा प्रकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत चर्मकार समाजातील स्व. गुणाबाई गाडेकर व स्व. सावित्री बोराडे यांचा इतिहास नोंद, डॉ सुनिता सावरकर लिखित 'स्मृतिगंध' या पुस्तकात वाचायला मिळाली. तोच धागा पकडून, स्मृती दिनानिमित्त आज (१६ मे २०२५) आयोजित करण्यात आले. असे सांगताना गाडेकर म्हणाले की, माझे कोणी ह्या नातेवाईक नाहीत, पण चर्मकार समाजातील महिला आहेत, म्हणून अभिमान वाटतो आहे. आणि हि माहिती कोणाला माहीत नाही, म्हणून हा प्रपंच. त्यानंतर, प्रमुख पाहुणे अक्षरश्री विलास देवळेकर यांनी स्व. गुणाबाई रामचंद्र गाडेकर यांच्या नावाने त्यांच्या जीवन कार्य परिचय वर उपयुक्त माहिती युक्त कविता सादर करताना, सामाजिक कार्यकर्ते गाडेकर यांनी आपल्याला ह्या कवितेसाठी खुप महत्वाचे सहकार्य लाभले, हे सांगायला देवळेकर विसरले नाहीत. आणि कविता वाचन करताना, सविस्तर कार्याबद्दल माहिती व मार्गदर्शन केले. त्या नंतर सामाजिक कार्यकर्ते शेरखान यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत, ह्या दोन्ही चर्मकार समाजातील महिलांचा इतिहास कथन करताना, तो समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न गाडेकर करत आहेत, म्हणून त्यांचे अभिनंदन केले. आणि ह्या दोन महिलांच्या कार्याचा 'प्रचार व प्रसार' आपण सर्वांनी करुया. अशी सदिच्छा व्यक्त केली. यावेळी गोविंद भोईटे, छाया ढवळे, शंकर गोपीरळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ज्या मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करत भाषण केले आहेत, त्या सर्वांना "संत शिरोमणी रोहिदास महाराज" यांची पुस्तके भेट देवळेकर यांनी दिली. आणि शेवटी, ह्या कार्यक्रमाचे समारोप व आभार प्रदर्शन अलका साबळे यांनी केले.

मोक्ष भावेश भंडारीचे दहावी मध्ये घवघवीत यश..!

गामदेवी,मुंबई (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) यंदा महाराष्ट्र राज्याचा दहावीचा निकाल 94.10 टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी निकालात बाजी मारली असून उत्तीर्ण झालेल्यी मुलींची टक्केवारी 96.14 अशी आहे, तर मुलांची टक्केवारी 92.21 अशी आहे. यात शारदा मंदिर हायस्कुल, गामदेवी, मुंबई च्या मोक्ष भावेश भंडारी या विद्यार्थ्याने दहावी मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. 93 टक्के मार्क्स मिळविणाऱ्या मोक्ष भंडारी याने आपल्या आई वडिलां सोबत आपल्या समाजाचे तसेच आपल्या कुटुंबियांचे देखील नाव रोशन केले आहे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेले मोक्षचे वडील भावेश सुकनराज भंडारी आणि आई मिता भावेश भंडारी, दादाजी - सुकनराज भंडारी आणि दादीजी - शांता सुकनराज भंडारी कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून मोक्षच्या कलागुणांचे आणि त्याला मिळालेल्या यशाचे मुंबईत सर्वत्र कौतुक केलं जात आहे

भारताशिवाय तुर्कीमध्ये बिरयाणी शिजणं अशक्यच,

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताने भारतानावर हल्ले करण्याचा प्रयत्न केला पण भारतीय लष्काराने पाकिस्तानचे सर्व प्रयत्न मोडून काढले. आता पण आता पाहिलं जात आहे की, या कठीण काळात भारताच्या शत्रूला कोणत्या कोणत्या देशांनी पाठिंबा दिला आहे. चीन नंतर पाकिस्तानचं समर्थन करणारा देश म्हणजे पाकिस्तान. पण पाकिस्तानचं समर्थन करणं आता तुर्कीला महागात पडणार आहे. कारण अनेक गोष्टींसाठी तुर्की भारतावर अवलंबून आहे. तुर्की येथील लोकं भारतातील तांदूळ आणि मसाल्याच्या पदार्थांवर अवलंबून आहेत. दोन्ही देशांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून व्यापारी संबंध आहेत. हा व्यवसाय 10 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाला आहे. पण आता पाकिस्तानला पाठिंबा देणे तुर्कीला महागात पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. 2023-24 मध्ये भारताने तुर्कीला 6.65 अब्ज डॉलर्सच्या वस्तूंची निर्यात केली. भारतातून तुर्कीमध्ये बऱ्याच गोष्टी जातात. या यादीत तांदूळ, मसाले, कापड, चहा आणि कॉफी यांचा समावेश आहे.

राजवर्धन पंडितचे एसएससी परीक्षेत उज्वल यश

गेवराई (प्रतिनिधी) छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलचा विद्यार्थी राजवर्धन रोहित पंडित यांनी मार्च 2025 मध्ये झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत 95 टक्के गुण प्राप्त करून उज्वल यश संपादन केले आहे या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलमध्ये शिक्षण घेणारा राजवर्धन पंडित हा विविध क्षेत्रांमध्ये अग्रेसर असून अनेक स्पर्धेमध्येही त्याने नावलौकिक मिळवलेला आहे. नुकत्याच झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत 95 टक्के गुण घेऊन यश संपादन केलेला राजवर्धन पंडित हा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा नातू आणि युवा नेते रोहित पंडित व माजी नगरसेविका स्वरूपाताई पंडित यांचा मुलगा आहे. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित,

गिरिकाभाभी पंडित, माजी जि प सभापती युधाजित पंडित, सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते रोहित पंडित, सौ स्वरूपाताई पंडित, यशराज पंडित यांच्यासह प्राचार्य व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस साजरा होणार

रक्तदान शिबीरासह विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन

गेवराई, दि. (प्रतिनिधी) :- शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय सैन्य दलातुन निवृत झालेल्या माजी सैनिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा होणार असल्यामुळे तरुणांमध्ये या निमित्ताने राष्ट्रप्रेम जागृत करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शनिवार दि. 17 मे रोजी सकाळी 11 वाजता गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, डॉ. मयुर सोनवणे, बळीराम गवते, अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रक्तदान शिबीर, पेढे तुला, सामान्य ज्ञान स्पर्धा आदी समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी युवकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातुन करण्यात आले आहे.

गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा भव्य सन्मान करुन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा होणार आहे. पहलगाम घटनेनंतर भारतीय सैन्याने केलेल्या कामगिरीचा प्रत्येक भारतीयांना अभिमान असुन भारतीय सैन्य दलातील जवानांप्रती आदरभाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभुमीवर माजी सैनिकांचा सन्मान करुन वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय शारदा स्पोर्ट्स अकॅडमी व रणवीर पंडित मित्र मंडळाने घेतला आहे. शनिवार दि. 17 मे रोजी सकाळी 11 वा. गेवराई शहरातील कृष्णाई

निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्लाध्यक्ष डॉ. मयुर सोनवणे, बीड पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्लाध्यक्ष अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान केला जाणार आहे.

कृष्णाई येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मौजे मादळमोही येथे जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजेंद्र वारंगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातुन शनिवार दि. 17 मे रोजी सकाळी 10 वा. रणवीर पंडित यांची भव्य पेढेतुला होणार आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com